# ज्यांना कॉक्रोज म्हणून हिणवलं त्यांनीच केंद्र सरकारला झुकवलं


beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

बीडसरकार

बीड महाराष्ट्र वर्ष १३ वे अंक २३३ शनिवार २५ जुलै २०२६ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दि.२६ जुलै २०२६ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA Year 13 Issu 233 Saturday 25 July 2026 RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तातडीने दिल्लीला रवाना



नवी दिल्ली (वृत्तसंस्था): कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनला सर्वात मोठं यश मिळालं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. नीट पेपर फुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारुन प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सीजेपीनं लावून धरली होती. यासाठी महिन्याभरापासून सीजेपीचं आंदोलन सुरू होतं. अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला आहे.

नीट पेपर फुटी प्रकरणी सीजेपीसह काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. सीजेपीच्या प्रवक्त्यांनी सरकार सोबत झालेल्या दोन बैठकांमध्ये राजीनाम्याचा विषय लावून धरला. पण सरकार याबद्दल फारसं अनुकूल नव्हतं. तर दुसऱ्या बाजूला प्रधान यांची राजीनाम्याबद्दल कोणतीही तडजोड होणार नाही, अशी ठाम भूमिका सीजेपीनं घेतली होती. यानंतर अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला.

सीजेपीच्या शिष्टमंडळाशी आज तिसऱ्या टप्प्यातील चर्चा सरकार करणार होतं. दुपारी साडे तीनच्या सुमारास बैठकीची वेळ ठरली होती. ही बैठक होण्यापूर्वीच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलेला आहे. प्रधान यांनी त्यांचा राजीनामा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केलेला आहे. पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात काम करण्याची संधी दिल्याबद्दल प्रधान यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पासून सत्तेत आहेत. केंद्रात त्यांच्या सरकारची तिसरी टर्म सुरू आहे. मोदी गेल्या १२ वर्षांपासून पंतप्रधान पदावर आहेत. या कालावधीत केवळ ७ नेते मोदींसोबत त्यांच्या मंत्रिमंडळात राहिले आहेत या ७ नेत्यांमध्ये प्रधान यांचा समावेश होता. गेल्या १२ वर्षांपासून प्रधान नॉट आऊट होते. अखेर नीट पेपर फुटी प्रकरणात त्यांची विकेट गेलेली आहे.



## सोमवारी सुप्रिम कोर्टात २० जिल्हापरिषद निवडणुकांबाबतची सुनावणी

बीड (सरकार)राज्यातील प्रलंबित असलेल्या २० जिल्हापरिषद आणि त्या अंतर्गतच्या पंचायत समितीच्या निवडणुकांसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीत शुक्रवारी पुन्हा ब्रेक बसला. शुक्रवारी यासंदर्भात परिणामकारक सुनावणी होऊ शकली नाही, आता या प्रकरणात सोमवारी (दि. २७ )सुनावणी होणार आहे

राज्यातील २० जिल्हापरिषद आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरून रखडलेल्या आहेत.ओबीसींना २७% आरक्षणाची अंमलबजावणी केल्यानंतर आरक्षण ५० % पेक्षा अधिक होत असल्याने या निवडणुका घेता आल्या नव्हत्या.सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाची टक्केवारी किती असावी? ५० % मर्यादेत हे आरक्षण



कसे बसवायचे आणि यासंबंधित विषयांवरून याचिका प्रलंबित असून त्यात तातडीने निवडणूक घेण्याचे निर्देश मागणाऱ्या हस्तक्षेप अर्जांचाही समावेश आहे.यावर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या.जोयमल्ल्या बागची,न्या.व्ही. मोहन्ना यांच्या पिठासमोर सुनावणी होत आहे. शुक्रवारी (दि. २४ ) हे प्रकरण ५२ व्या क्रमांकावर सुनावणीसाठी होते, मात्र शुक्रवारी यावर सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे आता या प्रकरणात पुढील सुनावणी सोमवारी (दि. २७ ) ठेवण्यात आली आहे. सोमवारी निवडणुका तातडीने घेण्यासंदर्भाने राज्य निवडणूक आयोग आणि सरकारच्या वतीने काय भूमिका घेतली जाते आणि आरक्षणाच्या तिढ्यातून न्यायालय काय मार्ग काढते यावर जिल्हापरिषद निवडणुका नेमक्या कधी होणार हे ठरणार आहे.

## प्लॉटिंग व्यावसायिक महावीर कोठारीच्या अपहरणाचा प्रयत्न

### शिवसेना युवा जिल्हाप्रमुखासह पाच जणांवर गुन्हा दाखल

बीड (सरकार): शहरातील जालना रोडवरील हिना पेट्रोल पंपाजवळ प्लॉटिंग व्यावसायिक महावीर हुकुमचंद कोठारी (वय ५१) यांना जुन्या पैशांच्या व्यवहारातून बेल्टने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून अपहरनाचा प्रयत्न करण्यात आला या घटनेमुळे बीड शहरात एकच खळबळ उडाली.

कोठारी यांनी आपली सुटका करून घेत उपचारासाठी प्रथम जिल्हा रुग्णालयात दाखल होत पुढील उपचारासाठी बीड येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल झाले. व्याजाच्या पैशातून मारहाण झाल्याची चर्चा होती. शिवसेना युवा जिल्हाप्रमुख गणेश गोरख शिराळे, अक्षय शिराळे व त्यांच्या इतर अनोळखी साथीदारांनी जबरदस्तीने फॉर्च्युनर गाडीत बसवून अपहरण केल्याचा आरोप प्लॉटिंग व्यवसाय



कोठारी यांनी केला आहे. तक्रारीनुसार, जाधव पेट्रोल पंपाजवळ नेल्यानंतर कोठारी यांना मारहाण करत जबरदस्तीने गाडीत बसवून मारहाण करत अपहरण करण्याचा प्रयत्न केला त्यातून कोठारींनी सुटका करून घेतली. या प्रकरणी शिवसेना युवा जिल्हाप्रमुख गणेश गोरख शिराळे, अक्षय शिराळे व इतर अनोळखी साथीदारांविरुद्ध बीड शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (अंतर्गत मारहाण, अपहरण, जीवे मारण्याची धमकी यांसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

कोठारी यांना गुन्हा दाखल न करण्यासाठी अनेकांनी दबाव टाकले देखील माहिती सांगत माझ्यावर खोटे होणे देखील दाखल होण्याची शक्यता असल्याने बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेतली असून सत्य परिस्थिती सांगितल्याची माहिती प्रसार माध्यमांसमोर सांगितली.

## बीडचे तत्कालीन शिक्षणाधिकारी हिंगोणेकर यांना धुळ्यातून अटक!



बीड (सरकार): तत्कालीन बीडचे माजी शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांना बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणी अटक केल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून या शालार्थ बोगस आयडी घोटाळ्यात आणखी कोण कोणते मोठे मासे गळाला लागणार आहेत याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे .

बीड शिक्षण विभागात एक वेगळी ओळख निर्माण करणारे लेखक तथा शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर १६० कोटी रुपयांच्या गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्यात पोलिसांनी त्यांना धुळ्यातून अटक केली आहे. २०११ ते २०१५ या काळात जळगाव जिल्ह्यात पदावर असताना त्यांनी २५९ जणांना बनावट मान्यता दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. हिंगोणेकर यांनी जळगाव मध्ये ज्याप्रमाणे घोटाळे करून बोगस शिक्षक भरतीला सहकार्य केले तशाच पद्धतीने त्यांनी बीडमध्ये देखील अनेक संस्थाचालक, कार्यवाह, सहकार्यवाह यांना मदत करून बीड जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात शालार्थ आयडी घोटाळा केला असून त्याचा तपास सुरु झाला आहे. १६० कोटी रुपयांच्या गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्यात तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांना पोलिसांनी धुळ्यातून अटक केली आहे.

२०११ ते २०१५ या काळात जळगाव जिल्ह्यात पदावर असताना त्यांनी २५९ जणांना बनावट मान्यता दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

## चक्री जुगारावर डीबी पथकाचा दोन ठिकाणी छापा

### १.३७ लाखांचा मुद्देमाल जप्त,डीबी पथक''अॅक्शन''मोडवर

बीड (सरकार): जिल्ह्यातील अवैध धंद्याना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक संबंधित पोलीस ठाण्यांना कारवाई करण्याच्या सूचना देत आहेत यामुळे अवैध धंद्याच्या प्रमाण कमी झाले असले तरी काही लोक चोरीछुपे जुगार खेळत असून त्यावर पोलीस कारवाया करत आहेत.

बीड शहर तसेच ग्रामीण भागात मटका पत्त्याचे क्लब,चक्री सुरू असून यावर पोलीस उपाधीक्षक यांचे विशेष पथक धडक कारवाया करत असल्याने अवैध धंदे करणारात खळबळ उडाली. मागील काही दिवसात बीड शहरातील काही भागात डी वाय एस पी पथकाने पत्त्याचे क्लब, वाळू तसेच अवैध मुरूम उपसावर कारवाई केल्याने पथक अॅक्शन मोडवर असल्याचे दिसत आहे. बीड शहरातील अवैध चक्री जुगारावर,धड्ड पथकाने शुक्रवारी (दि. २४ जुलै) सलग दोन ठिकाणी धाड टाकून एकूण १ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत चार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून शहरातील अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पहिली कारवाई दुपारी २.०६ वाजता पांगरी रोडवरील डायमंड मटण शॉपसमोर करण्यात आली. येथे चक्री नावाचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने छापा टाकून तीन आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत ७३,९०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर दुपारी २.३३ वाजता सम्राट चौक, बीड येथे दुसरी कारवाई करण्यात आली. या ठिकाणी एका आरोपीला ताब्यात घेऊन ६३,१०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही कारवायांमध्ये मिळून १,३७,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सय्यद, अविनाश सानप, संतोष रणदिवे,कुलदीप औसरमल,शशिकांत ढाकणे आणि विशाल जगताप यांनी केली.

## विलास घुले खुन प्रकरणाचा सीडीआरमधून मोठा खुलासा

बीड (सरकार) विलास घुले खून प्रकरणात खासदारपुत्र सौरभ सोनवणेचे आरोपी सोबत संपर्क झाल्याचे सीडीआर मधून समोर आले आहे परंतु सौरभ सोनवणे ला कोणाच्या फोनवरून पंधरा फोन आणि कॉन्फरन्सचे आठ फोन झाले आहेत घुले या मध्ये स्पष्ट झाले आहे म्हणून ज्याच्या फोनवरून फोन झाले आहेत त्याला आणि ज्यांना फोन झाले आहेत त्यांना तात्काळ अटक करा असा कुटुंबाचा दावा आहे येत्या सात दिवसात अटक न केल्यास कुटुंबांसह आमरण उपोषण करण्याचा घुले कुटुंबाचा पोलिसांना अल्टिमेटम दिला आहे



बीडच्या केज तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले खून प्रकरणात एक नवीन अपडेट आली आहे. विलास घुले याची हत्या होण्यापूर्वी एक मीटिंग झाली होती. यादरम्यान बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरभ सोनवणे याचा आरोपीसोबत फोनवरून संपर्क झाल्याचा आरोप रमेश घुले यांनी केला आहे. सीडीआर मध्ये स्पष्ट उल्लेख आल्याने घुले कुटुंब आता आक्रमक झाले आहे. SIT च्याच अधिकाऱ्यांनी ही माहिती दिल्याचा दावा घुले कुटुंबाने केला आहे. बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले आहे. सात दिवसात सौरभ सोनवणेसह सीडीआर मधील संपर्कात आलेल्या आरोपींना अटक करा अन्यथा कुटुंबासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करू असा इशारा घुले कुटुंबाने निवेदनातून दिला आहे. माझ्या भावाचा खून हा कट रचून करण्यात आला आहे आणि याचा मुख्य सूत्रधार सौरभ सोनवणे आहे सीडीआर प्रमाणे सौरभ सोनवणे इतर ज्यांना फोन झाले आहेत त्यांना तात्काळ अटक करा अशी मागणी रमेश घुले यांनी केली आहे.

## बेपत्ता तरुणाचा मृतदेह बिंदूसरा तलावात सापडला

### अग्निशामक दल कर्मचाऱ्यांनी मृतदेह काढला बाहेर

बीड (सरकार): बीड शहरालगत पाली येथील बिंदुसरा प्रकल्पात शुक्रवारी दुपारी ४० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. सकाळी प्रकल्पाच्या काठावर मोटारसायकल व चप्पल आढळून आल्याने नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली होती. माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशामक दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

सकाळपासून तलावात शोधमोहीम सुरू होती. अखेर दुपारी अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्नांनंतर पाण्यातून मृतदेह बाहेर काढला. मृताची ओळख हमीद बागवान (वय ४०, रा. मोमीनपुरा, बीड) अशी पटली आहे. प्राथमिक माहितीनुसार, कर्करोगाच्या आजारामुळे नैराश्यातून त्यांनी तलावात उडी घेऊन जीवन संपवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल व पोलिसांच्या तपासानंतर स्पष्ट होणार आहे.



तलावातील पाण्याची खोली आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे शोधमोहीमेत अनेक अडचणी आल्या परंतु अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न करून मृतदेह बाहेर काढला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. यावेळी अग्निशामक दलाचे किशोर जाधव (अग्निशमन अधिकारी),गोरकनाथ ढोकणे (फायरमन), कृष्णा जंगले( लिडिंग फायरमन ), अनिकेत कापले (वाहन चालक), प्रकाश तिकडे (फायरमन) अनिकेत ओव्हल (वाहन चालक) यांनी मृतदेह बाहेर काढला.

## संपादकीय

# मराठवाड्यात रेल्वे क्रांतीची नांदी

मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला आता नवी गती मिळणार आहे. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या महत्त्वाकांक्षी २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली असून, या प्रकल्पामुळे मागासलेल्या रेल्वे सुविधांना मोठा बूस्टर मिळण्याची अपेक्षा आहे.

मराठवाड्यात रेल्वे विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या नवीन रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले असून, अहवाल पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनासोबत पुढील चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित संस्थांकडून आवश्यक मंजुरी घेतल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कोणत्याही मोठ्या रेल्वे प्रकल्पाला तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणून या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आहे. धाराशिव आणि बीड हे मराठवाड्यातील असे जिल्हे आहेत, जिथे रेल्वे सुविधांचा विस्तार तुलनेने कमी आहे. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गामुळे या दोन्ही जिल्ह्यांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या मार्गामुळे प्रवास सुलभ होण्यासोबतच व्यापार, उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा रेल्वे मार्ग केवळ धाराशिव आणि बीड जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या मार्गामुळे मराठवाड्यातील विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांची सोय होणार असून, या भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे.

रेल्वेचा विकास हा कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. छत्रपती संभाजीनगर हे सध्या राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. औद्योगिक विकास, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक हब म्हणून या जिल्ह्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर हा प्रस्तावित नवीन रेल्वे मार्ग दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच पुढील दक्षिण भारताशी अधिक थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वे जोडणीमुळे केवळ प्रवाशांची सुविधा वाढणार नाही, तर मालवाहतुकीसाठी अधिक सक्षम आणि कार्यक्षम रेल्वे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. विशेषतः शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), अभियांत्रिकी आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना या मार्गाचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. कंटेनर, औद्योगिक कच्चामाल, तयार उत्पादने तसेच कृषी मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करणे शक्य होईल. परिणामी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. हा रेल्वे प्रकल्प भविष्यात मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळणाच्या सुविधांच्या बाबतीत मराठवाड्याने गेल्या काही वर्षांत प्रगती केली असली तरी अनेक मोठ्या प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. या भागाला सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता असून, त्यासाठी प्रभावी नियोजन आणि मजबूत नेतृत्वाची गरज आहे. वेळेची बचत आणि जलद प्रवासासाठी आज अनेक नागरिक विमानसेवेकडे वळत आहेत. मात्र, मराठवाड्यासारख्या आठ जिल्ह्यांच्या मोठ्या विभागात सध्या केवळ छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथेच विमानसेवा उपलब्ध आहे. भविष्यात या सुविधा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्यास प्रादेशिक विकासाला आणखी वेग मिळू शकतो. रेल्वे, विमान आणि रस्ते वाहतुकीचे सक्षम जाळे निर्माण झाल्यास मराठवाडा केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदूबनू शकतो.

जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील नागरिकांना विमान प्रवासासाठी आजही शेकडो किलोमीटरचा प्रवास करून विमानतळ गाठावे लागते. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथून मोजक्याच शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असल्याने अनेक प्रवाशांना मुंबई किंवा पुणे गाठून पुढील हवाई प्रवास करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बीड येथे विमानतळ उभारणीच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. प्रस्तावित विमानतळासाठी बीडमध्ये तांत्रिक सर्वेक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे बीड विमानतळाच्या उभारणीचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळते यावरच बीडकरांचे विमानतळाचे स्वप्न अवलंबून आहे.दरम्यान, लातूर विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ जून रोजी ५६ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून लातूर विमानतळाचा विकास होऊन आगामी काळात तेथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता वाढली आहे.सध्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरू या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. तर नांदेड विमानतळावरून बंगळुरू, हैदराबाद, गाझियाबाद, गोवा, पुणे, अहमदाबाद आणि नागपूर या शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे.मराठवाड्यातील बीड आणि लातूर येथून आगामी काळात विमानसेवा सुरू झाल्यास या भागाच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन रेल्वे मार्गांसोबतच विमानसेवेचा विस्तार ही मराठवाड्यासाठी निश्चितच आनंदाची बाब ठरत आहे.राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात असल्याने मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळत आहे.

# हृदयविकाराचा झटका फक्त छातीत दुखण्यापुरता मर्यादित नाही; डॉक्टरांनी सांगितले ५ गंभीर संकेत!

लक्षणे अत्यंत सुप्त किंवा शरीराच्या इतर भागांत दिसू शकतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे जीवावर बेतू शकते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, हृदयविकाराचे काही 'सायलेंट' किंवा वेगळे संकेत खालीलप्रमाणे आहेत:

**१. छातीव्यतिरिक्त इतर भागांत वेदना**

अनेकांना हे ठाऊक नसते की हृदयाशी संबंधित वेदना शरीराच्या वरच्या भागात पसरू शकतात.

डावा हात: डाव्या हातामध्ये खांद्यापासून बोटांपर्यंत मुंग्या येणे किंवा वेदना होणे.

जबडा आणि दात: जबड्यामध्ये अचानक कळा येणे किंवा दात दुखीसारखी जाणीव होणे (जी दातांच्या समस्येमुळे नसते).

**२. पोटाच्या समस्या आणि अपचन**

बऱ्याचदा लोक हृदयविकाराच्या झटक्याला 'ॲसिडिटी' किंवा 'गॅस' समजून दुर्लक्ष करतात.

जर तुम्हाला अचानक मळमळणे, उलट्या होणे किंवा पोटात वरच्या बाजूला जळजळ होत असेल, तर ते हृदयावर येणाऱ्या ताणाचे लक्षण असू शकते.

विशेषतः जर हे त्रास श्रमानंतर (चालणे, जिने चढणे) जाणवत असतील, तर अधिक सावध राहणे गरजेचे आहे.




**३. श्वास घेण्यास त्रास होणे**

छातीत वेदना होत नसली तरी, जर तुम्हाला बसल्या जागी किंवा थोडे चालल्यावरही दम लागल्यासारखे वाटत असेल, तर हे हृदय कमकुवत झाल्याचे लक्षण असू शकते. फुफ्फुसांना पुरेसा रक्तपुरवठा न झाल्याने श्वास कोंडल्यासारखा वाटतो.

**४. थंड घाम येणे आणि चक्कर येणे**

कोणतेही शारीरिक काम न करता किंवा थंड वातावरणात असतानाही अचानक थंड घाम सुटणे हे धोक्याचे लक्षण आहे. हृदय रक्ताभिसरण करण्यास असमर्थ ठरत असताना शरीर अशा प्रकारे प्रतिसाद देते. यासोबतच डोळ्यांसमोर अंधारी येणे किंवा चक्कर येणे हे देखील गंभीर संकेत आहेत.

**५. अतिशय थकवा**

जर तुम्हाला गेल्या काही दिवसांपासून साध्या कामांतही अतिशय थकवा जाणवत असेल, जो विश्रांती घेतल्यावरही जात नसेल, तर एकदा डॉक्टरांकडून हृदयाची तपासणी करून घेणे योग्य ठरते.

**कधी सावध व्हावे?**

जर तुम्हाला मधुमेह असेल, तर तुम्हाला छातीत वेदना न होता 'सायलेंट हार्ट अटॅक' येण्याचा धोका जास्त असतो.

उच्च रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल असलेल्या व्यक्तींनी वरील लक्षणांकडे विशेष लक्ष द्यावे. महत्त्वाची टीप: जर वरीलपैकी कोणतेही लक्षण अचानक आणि तीव्रतेने जाणवत असेल, तर घरगुती उपाय किंवा ॲसिडिटीचे औषध घेण्याऐवजी तातडीने जवळच्या रुग्णालयात जाऊन एउत्र्करून घ्यावा. वेळेवर मिळणारे उपचार जीव वाचवू शकतात.

# मूत्रपिंडात खडे का होतात? जाणून घ्या मुख्य कारणं

मूत्रपिंडात खडे होण्याची समस्या सध्या अतिशय सामान्य झाली आहे. आहारविहारातील बदल आणि पाण्याच्या कमतरतेमुळे हा त्रास उद्भवतो. मूत्रपिंडात खडे होण्याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत:

**१. शरीरात पाण्याची कमतरता :** हे सर्वात महत्त्वाचे आणि सामान्य कारण आहे. जेव्हा आपण पुरेसे पाणी पीत नाही, तेव्हा लघवी घट्ट होते. यामुळे लघवीतील क्षार विरघळण्याऐवजी एकत्र जमा होऊन त्याचे स्फटिकात रूपांतर होते, ज्यातून पुढे खडा तयार होतो.

२. चुकीचा आहार : जास्त मीठ आहारात मिठाचे प्रमाण जास्त असल्यास लघवीतून कॅल्शिअम बाहेर पडण्याचे प्रमाण वाढते, ज्यामुळे खडे तयार होतात.

प्राणिजन्य प्रथिने

मांस, अंडी किंवा मासे अतिप्रमाणात खाल्ल्याने शरीरात युरिक सिडचे प्रमाण वाढते.

ऑक्झलेटयुक्त पदार्थ

पालक, टोमॅटोच्या बिया, काजू, चॉकलेट यांसारख्या पदार्थांमध्ये ऑक्झलेट जास्त असते, जे कॅल्शिअमसोबत मिळून खडे तयार करतात.

**३. अनुवंशिकता:** जर तुमच्या कुटुंबात (आई-वडील किंवा भावंडांना) किडनी स्टोनचा त्रास असेल, तर तुम्हाला तो होण्याची शक्यता अधिक असते. काही लोकांच्या शरीरात जन्मजातच क्षार साठवण्याची प्रवृत्ती असते.

**४. लठ्ठपणा आणि वजन वाढणे:** ज्या व्यक्तींचे वजन जास्त असते किंवा ज्यांचा 'इचख' जास्त असतो, त्यांच्या चयापचय क्रियेत बदल होतो. यामुळे लघवीतील आम्लतेचे प्रमाण बदलून खडे तयार होण्याची शक्यता वाढते.

**५. विशिष्ट आजार किंवा शस्त्रक्रिया:** पचनसंस्थेचे आजार: क्रोहन डिसीज किंवा अतिसारामुळे शरीरातील पाणी आणि क्षारांचे संतुलन बिघडते.




हायपरपॅराथायरॉईडीझम: शरीरातील कॅल्शिअमची पातळी नियंत्रित करणाऱ्या ग्रंथींमध्ये दोष निर्माण झाल्यास खडे होऊ शकतात.

यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन: लघवीच्या मार्गात वारंवार संसर्ग झाल्यासही काही प्रकारचे खडे तयार होतात.

**६. औषधांचे दुष्परिणाम:** काही वेळा व्हिटॅमिन सी च्या गोळ्या, कॅल्शिअम सप्लिमेंट्स किंवा पित्तशामक औषधांचे अतिसेवन केल्यामुळे खडे होऊ शकतात.

किडनी स्टोन टाळण्यासाठी काही सोपे उपाय: दिवसभरात किमान ३ ते ४ लिटर पाणी प्या. लिंबू पाणी किंवा नारळ पाण्याचे सेवन करा (यात असणारे सायट्रेट खडे रोखण्यास मदत करते). मिठाचा वापर मर्यादित ठेवा. लघवी रोखून धरू नका.

# ४५अंश सिल्सीएस तापमानात आरोग्य कसे जपावे?

४५ अंश सेल्सीएस तापमान म्हणजे प्रचंड उष्णता, अशा काळात आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असते. उष्माघात आणि डिहायड्रेशनपासून वाचण्यासाठी खालील गोष्टींचे पालन करा:

१. पाण्याचे प्रमाण वाढवा

भरपूर पाणी प्या: तहान लागण्याची वाट पाहू नका. दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या.

नैसर्गिक पेये: नारळ पाणी, ताक, लिंबू सरबत, कोकम सरबत किंवा वाळ्याचे पाणी घ्या. यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स टिकून राहतात.

**२. आहार आणि खाण्यापिण्याच्या सवयी**

हलका आहार: उन्हाळ्यात पचायला हलके अन्न खा. जास्त मसालेदार, तेलकट आणि जंक फूड टाळा.


पाणीदार फळे: कलिंगड, संत्री, द्राक्षे, काकडी यांसारखी जास्त पाणी असलेली फळे आणि भाज्यांचा आहारात समावेश करा.

शिळे अन्न टाळा: उष्णतेमुळे अन्न लवकर खराब होते, त्यामुळे ताजे अन्नच खा.

**३. घराबाहेर पडताना घ्यायची काळजी**

वेळ पाळा: दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळा.

कपड्यांची निवड: फिकट रंगाचे आणि सैल सुती कपडे वापरा. सुती कपड्यांमुळे घाम शोषला जातो आणि हवा खेळती राहते. संरक्षण: बाहेर जाताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी सनग्लासेस वापरा.




**४. शरीराचे तापमान नियंत्रित ठेवा**

थंड पाण्याचा वापर: दिवसातून दोनदा अंघोळ करा. बाहेरून आल्यावर लगेच फ्रीजमधील थंड पाणी पिऊ नका, थोडा वेळ थांबून माठातील पाणी प्या. घराचे तापमान: खिडक्यांना पडदे लावा जेणेकरून थेट उन्हाचा कडाका घरात येणार नाही. संध्याकाळी हवा थंड झाल्यावर खिडक्या उघड्या ठेवा.

**उष्माघाताची लक्षणे ओळखा:**

जर तुम्हाला किंवा कोणाला खालील लक्षणे दिसली, तर तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधा: खूप जास्त ताप येणे पण घाम न येणे. चक्कर येणे किंवा मळमळणे. तीव्र डोकेदुखी. त्वचा लाल आणि कोरडी पडणे.

# ओव्याचे पाणी पिण्याची योग्य पद्धत आणि फायदे जाणून घ्या



हिवाळ्यात, वाढत्या वायू प्रदूषणासह, सर्दी, खोकला आणि छातीत जळजळ होण्याची समस्या वाढवते. बदलत्या जीवनशैलीमुळे आणि कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे, लोक वारंवार या समस्यांशी झुंजतात. परिणामी, औषधांसोबतच, घरगुती आणि नैसर्गिक उपायांकडे कल वेगाने वाढत आहे. या घरगुती उपायांपैकी, ओवा पाणी हे एक साधे, स्वस्त आणि प्रभावी उपाय मानले जाते.

**ओव्याच्या पाण्याचे फायदे**

ओवा दाहक-विरोधी, जीवाणूरोधी आणि कफ पाडणारे गुणधर्म आहेत. हे गुणधर्म छातीतील श्लेष्मा सोडण्यास, श्वसनमार्ग साफ करण्यास आणि जळजळ कमी करण्यास मदत करतात. नियमित आणि मर्यादित प्रमाणात सेवन केल्याने श्वास घेण्यास मदत होते आणि छातीत जडपणा कमी होतो. म्हणूनच भारतीय घरांमध्ये हंगामी आजारांदरम्यान शतकानुशतके ओवाच्या वापर केला जात आहे.

ओव्याचे पाणी कसे बनवायचे? ओव्याचे पाणी बनवणे खूप सोपे आहे. सर्वप्रथम १ कप पाणी उकळवा. उकळत्या पाण्यात १ चमचा ओवा घाला. ते मंद आचेवर ५-१० मिनिटे उकळवा, जेणेकरून ओव्याचे गुणधर्म पाण्यात चांगले विरघळेल. पाणी गाळून घ्या आणि कोमट झाल्यावर प्या. ते दिवसातून १ ते २ वेळा सेवन केले जाऊ शकते. कोमट ओवा पाणी केवळ घसा आणि छातीला आराम देत नाही तर पचनसंस्था देखील मजबूत करते. रोगप्रतिकारक शक्ती आणि पचनशक्तीसाठी देखील फायदेशीर आहे. आयुर्वेदानुसार, ओव्याचे पाणी केवळ सर्दी आणि फ्लूमध्ये मदत करत नाही तर रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवते. ते शरीराला आतून उबदार ठेवते, थंडीच्या काळात संसर्गाचा धोका कमी करते. ते गॅस, अपचन आणि पोटफुगीपासून देखील आराम देते.

**खबरदारी :** जास्त प्रमाणात सेवन केल्याने पोटात जळजळ किंवा आम्लता होऊ शकते. रिकाम्या पोटी ओव्याचे पाणी घेण्यापूर्वी तुमची सहनशीलता तपासा.

गर्भवती महिलांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच ओव्याच्या पाण्याचे सेवन करावे. मुलांना ते देण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे. ओव्याच्या पाण्याचे सेवन केल्यानंतर तुम्हाला काही अस्वस्थता जाणवत असेल तर ते ताबडतोब वापरणे थांबवा. हिवाळ्यात निरोगी राहण्यासाठी संतुलित आहार, पुरेसे पाणी, स्वच्छ हवा आणि असे घरगुती उपाय खूप फायदेशीर ठरू शकतात.

# उन्हाळ्यात जांभूळ खाण्याची योग्य पद्धत व फायदे जाणून घ्या

जांभूळ हे उन्हाळ्यात आढळणारे एक काळे फळ असून ते आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. त्यातील पोषक तत्वे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकतात.

उन्हाळ्याच्या दिवसांत निसर्ग आपल्याला अशा अनेक देणग्या देतो, ज्या केवळ तहानच भागवत नाहीत, तर शरीराला गंभीर आजारांशी लढण्याची शक्तीही देतात. असेच एक फळ मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास आणि इतर अनेक आरोग्य समस्या टाळण्यास मदत करते. हे सुपरफूड आहे जांभूळ.

**मधुमेह नियंत्रित ठेवण्यास मदत करते**

जांभूळामध्ये जॅम्बोलिन आणि जॅम्बोसिन नावाची संयुगे असतात. ही संयुगे रक्तामध्ये साखरेचे प्रमाण हळूहळू वाढवतात आणि शरीरातील इन्सुलिनची पातळी वाढवण्यास मदत करतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, केवळ फळच नव्हे तर त्याच्या बियादेखील अत्यंत फायदेशीर आहेत. जांभूळ बियांच्या पावडरच्या नियमित सेवनाने टाईप २ मधुमेहाच्या रुग्णांच्या साखरेची पातळी लक्षणीयरीत्या संतुलित होऊ शकते.

**रक्तदाब आणि हृदयाचे आरोग्य**

जांभूळ पोटॅशियमचा एक उत्तम स्रोत आहे. १०० ग्रॅम जांभूळामध्ये अंदाजे ५५ मिग्रॅ पोटॅशियम असते, जे उच्च रक्तदाब, पक्षाघात आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करते. तसेच ते धमन्या कठीण होण्यास प्रतिबंध करते आणि संपूर्ण शरीरातील रक्तप्रवाह सुधारते. पचनसंस्थेवरील रामबाण उपाय उन्हाळ्यात अपचन, गॅस



आणि बद्धकोष्ठता यांसारख्या पोटाच्या समस्या अनेकदा वाढतात. जांभळामधील शीतलता देणारे गुणधर्म आणि फायबर पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करतात. तसेच, त्यामुळे आव आणि अतिसारासारख्या समस्यांपासूनही आराम मिळतो.

**चमकदार त्वचा आणि तोंडाचे आरोग्य राखतो**

जांभळामध्ये व्हिटॅमिन सी आणि लोह भरपूर प्रमाणात असते. ते रक्त शुद्ध करते, मुरुमे कमी करते आणि त्वचेला नैसर्गिक चमक देते. याशिवाय, जांभळाची पाने आणि साल दात आणि हिरड्या मजबूत करण्यासाठी देखील वापरली जातात.

**खाण्याची योग्य पद्धत –** सकाळी उठल्याबरोबर रिकाम्या पोटी ब्लॅकबेरी कधीही खाऊ नका, त्यामुळे सिडिटी होऊ शकते. जांभूळ नेहमी थोडे काळे मीठ किंवा सैंधव मीठ घालूनच खा, यामुळे ते सहज पचते. बेरी खाल्ल्यानंतर लगेच दूध किंवा दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करणे टाळा. दिवसभरात १००-१५० ग्रॅमपेक्षा जास्त बेरी खाऊ नका. जांभूळ हे केवळ एक हंगामी फळ नाही, तर ते आरोग्याचे एक परिपूर्ण भांडार आहे. उन्हाळ्यातील आहारात याचा समावेश केल्याने तुम्हाला साखर आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास तर मदत होतेच, शिवाय तुमची रोगप्रतिकारशक्तीही वाढते.

# बेजबाबदार वृत्ते प्रसारित करू नका!

## सरन्यायाधीश सूर्यकांत वृत्तमाध्यमांवर संतप्त

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):-** संसदेवर नेण्यात आलेल्या मोर्चाला हिंसक वळण लागल्याप्रकरणी सादर करण्यात आलेल्या याचिकेवर त्वरित सुनावणी करण्यास सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नकार दिला, असे वृत्त अनेक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. तथापि, हे वृत्त धादांत खोटे असून वृत्तपत्रे आणि माध्यमांनी बेजबाबदारपणे ते प्रसिद्ध केले आहे. अशा प्रकारची कोणत्याही याचिका अद्याप सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेली नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी शुक्रवारी केले. यापुढे सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजासंबंधी कोणताही व्हिडिओ किंवा क्लिप सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वानुमतीशिवाय प्रसिद्ध केली जाऊ नये, असा आदेशही त्यांनी आता दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयासमोर कोणतीही याचिका नाही. केवळ एका वकीलांने विनंती पत्र आणि त्यासंबंधात काही कागदपत्रे सादर केली होती. याचिका अशा प्रकारे सादर केली जात नाही. तथापि, याचिकेवर त्वरित सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार, अशा प्रकारची वृत्ते प्रसिद्ध करण्यात आली. यामुळे गैरसमज पसरला आहे. रीतसर पद्धतीने सादर करण्यात आलेल्या याचिकेवरच सुनावणी होऊ शकते. अन्य प्रकारे सादर केलेल्या कागदपत्रांवर सुनावणी होऊ शकत नाही. त्यामुळे वृत्तमाध्यमांनी तारतम्य राखून वृत्तांना प्रसिद्धी द्यावी, अशी सूचना त्यांनी केली.

**नरेंद्र मिश्रा यांचे सादरीकरण**

दिल्लीतील एक वकील नरेंद्र मिश्रा यांनी नीट मोर्चा प्रकरणी झालेल्या पोलीस लाठामाराची चौकशी न्यायालयाच्या देखरेखीत करण्यात यावी, अशा अर्थाचे पत्र सर्वोच्च न्यायालयाला सादर केले होते. तसेच लाठीमाराची काही छायाचित्रेही सादर केली होती. तथापि, हे पत्र याचिकेच्या स्वरुपात नसल्याने सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी त्यावर सुनावणी करण्यास नकार दिला होता. पण वृत्तपत्रांनी आणि वृत्तवाहिन्यांनी याचिकेवर सुनावणी करण्यास नकार, असे वृत्त प्रसिद्ध पेले होते.

**व्हिडिओ प्रसिद्धीस पूर्वानुमती आवश्यक**



सर्वोच्च न्यायालयात चालणाऱ्या कामकाजाचे व्हिडिओचित्रण किंवा चित्रणाची क्लिप न्यायालयाच्या अनुमतीशिवाय प्रसिद्ध किंवा शेअर केली जाऊ नये, असा आदेश सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी दिला आहे. अर्धवट चित्रण प्रसिद्ध केल्याने अनेक प्रकारचे गोंधळ होऊ शकतात. म्हणून असा आदेश देण्यात आला आहे.

## शासनाकडून (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस्सी. ॲग्री) अभ्यासक्रमाचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास दि. ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ

**बीड (प्रतिनिधी):** १२वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्र आणि कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दि.१० जुलै २०२६ पासून सुरू असून ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी अन्नतंत्र (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस्सी. ऑनर्स. ॲग्री) पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ संलग्न असलेल्या अ दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी त्वरित यावे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एन.ई.ई.टी. (गएए छएएढ) दिलेल्या आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे त्वरित संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांनी सागर हाईट्स, बस स्टॅन्ड समोर, बीड येथे यावे, याठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याच्या सर्व सुविधा विनामुल्य (मोफत) उपलब्ध आहेत, तरी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेवून प्रवेशासाठी त्वरित संपर्क साधावा आणि प्रवेश घ्यावा, असे महाविद्यालयातर्फे आवाहन करण्यात येत आहे. संपर्कासाठी फोन नं.: ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८२०११ / ७५८८८२०३४

# राहुल गांधी आक्रमक, विद्यार्थ्यांच्या तीन नव्या मागण्या मांडल्या,

## थेट पंतप्रधान मोदींच्या माफीची मागणी

**दिल्ली (वृत्तसेवा):** नीट पेपरफुटी प्रकरणावरुन दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या विद्यार्थी आणि कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे केंद्र सरकार गेल्या १२ वर्षातील सर्वात मोठ्या कोंडीत सापडले असताना आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सरकारवरील दबाव आणखीनच वाढवला आहे. राहुल गांधी यांनी शनिवारी नवी दिल्लीत आंदोलक विद्यार्थ्यांसोबत पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या तीन महत्त्वाच्या मागण्या प्रसारमाध्यमांसमोर मांडल्या. या तीन मागण्यांबाबत कोणतीही तडजोड किंवा चर्चा होणार नाही, असे राहुल गांधी यांनी ठणकावून सांगितले.

राहुल गांधी यांनी म्हटले की, आंदोलक विद्यार्थ्यांच्या तीन मागण्या आहेत. पहिली मागणी ही आहे की, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान हे भ्रष्टाचारी आणि अकार्यक्षम आहेत. त्यांना मंत्रिपदावरुन दूर करावे. केंद्र सरकारमध्ये अशी चर्चा सुरु आहे की, धर्मेंद्र प्रधान यांच्याकडून शिक्षण खाते काढून त्यांना मोदींच्या मंत्रिमंडळात दुसरे एखादे खाते द्यावे. पण हे विद्यार्थी आणि देशातील नागरिकांना मान्य नाही. धर्मेंद्र प्रधान हे भ्रष्टाचाराचे प्रतीक आहेत. देशाचे भविष्य असणाऱ्या शिक्षणक्षेत्राचा त्यांनी विध्वंस केला. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांना दुसरे कोणतेही खाते देऊ नये. त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून बाहेर ठेवावे, असे राहुल गांधी यांनी म्हटले. विद्यार्थ्यांची दुसरी मागणी म्हणजे, दिल्ली पोलिसांच्या लाठीमारात अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यांची डोकी फुटलेत, पाय तुटले आहेत, काहीजण पेलेट गनमुळे जखमी झाले आहेत. या सगळ्यासाठी आदेश देणाऱ्यांना आणि तो अंमलात आणणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. पंतप्रधान मोदी हे या सगळ्या यंत्रणेचे प्रमुख आहेत. विद्यार्थ्यांच्या आणि देशाच्या भविष्यासोबत जो काही खेळ झाला, त्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी माफी मागितली पाहिजे. या विद्यार्थ्यांच्या तीन मागण्या असून त्याबाबत कोणतीही चर्चा होऊ शकत नाही, असे राहुल गांधी यांनी सांगितले. तिसरी मागणी म्हणजे जे संपूर्ण देशाची व्यवस्था चालवत आहेत, पंतप्रधान मोदी, जे रात्रभर व्हिडीओ तयार करत आहेत. काल व्हिडीओ शेअर केला की, विद्यार्थ्यांच्या खूप चांगल्या सूचना आल्या. या विद्यार्थ्यांना सूचनांशी देणेघेणे नाही, त्यांची मागणी सूचनांची नाही. त्यांची मागणी धर्मेंद्र प्रधान यांना मंत्रिपदावरुन दूर करावे, ही आहे. या सगळ्या यंत्रणेच्या प्रमुखाने विद्यार्थ्यांची माफी मागावी. विद्यार्थ्यांना मारण्यात आलंय, त्यांचा अपमान करण्यात आला, हे मान्य करावे, असे राहुल गांधी यांनी म्हटले. मला प्रत्येक विद्यार्थ्याचा अभिमान आहे, जो संविधानाकडून सरकारकडून होणारा हल्ला, यंत्रणांवर होणारा हल्ला, या सगळ्याचा विरोध करत आहे.



# राज्यात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

## कोकण, घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रात सतर्कतेचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी):** राज्यात पुढील दोन ते तीन दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला असून अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मान्सूनची प्रणाली अधिक सक्रिय झाल्यामुळे तसेच गुजरातपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने त्याचा परिणाम महाराष्ट्रातील बहुतांश भागांवर होत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

विशेषतः पुणे आणि सातारा जिल्ह्यातील घाटमाथा परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाटमाथा परिसरासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला



आहे. उत्तर कोकणात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार, तर काही भागांत अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दक्षिण कोकण, गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रांमध्येही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, गोंदिया जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे खरीप हंगामातील शेती कामांना वेग आला आहे. धान उत्पादक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदियामध्ये धान लागवडीची कामे वेगाने सुरू असून शेतकरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतात मेहनत घेत आहेत. धान लागवडीसाठी महिला मजुरांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाल्याने ग्रामीण भागात स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

याउलट अकोला जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही. जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ७८ टक्के पावसाची नोंद झाली असून जवळपास ५० हजार हेक्टर क्षेत्रावरील खरीप पेरणी अद्याप बाकी आहे. पावसाची २२ टक्के तूट असल्याने धरणांमधील पाणीसाठाही अपेक्षेपेक्षा कमी आहे. अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने चिंता वाढली आहे. उशिरा पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार अल्पकालीन पिकांची निवड करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. अल्प कालावधीत अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद होत असल्याबाबत भारतीय हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी वातावरणातील बदल, मान्सूनच्या प्रणालीतील चढ-उतार, एल निनो आणि ला निना यांसारख्या हवामान घटकांचा प्रभाव तसेच वाढते प्रदूषण ही प्रमुख कारणे असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करत आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी विद्यार्थी जनक्रांती रॅली

**बीड (प्रतिनिधी):-** दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ तसेच नीट (छएएढ) प्रश्नपत्रिका फुटीच्या विरोधात बीड येथे सोमवार, २७ जुलै रोजी भव्य विद्यार्थी-पालक जनक्रांती रॅली आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ११ वाजता किल्ला मैदान (बलभीम-मिलिया महाविद्यालय परिसर) येथून रॅलीला प्रारंभ होणार आहे.

या रॅलीत बीड शहरातील शाळा, महाविद्यालये, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, पालक तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. सहभागी विद्यार्थी व पालक हातात तिरंगा ध्वज आणि महापुरुषांची छायाचित्रे घेऊन शांततेत रॅली काढणार आहेत. आयोजकांनी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

रॅलीच्या पार्श्वभूमीवर शासकीय विश्रामगृह येथे नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीत रॅलीचे नियोजन, शिस्त, मार्ग आणि कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोहोचल्यानंतर नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार असून, कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने होणार आहे.बैठकीस सुशीलाताई मोराळे, प्राचार्य डॉ. सविता शेटे, प्राचार्य डी. जी. तांदळे, दादासाहेब मुंडे, शेख शफीक, अमर शेख, राजेंद्र आमटे, अविनाश डरफे, बाळासाहेब मोरे, गणेश मस्के, संगमेश्वर आंधळकर, ज्योतिराम हुरकुटे, सय्यद मुसा, नितीन जयभये, सय्यद अब्दुल, सुहास जयभये, डॉ. संजय तांदळे, शेख आदम, विजय घेवारे, सोपान पोपट आदी उपस्थित होते.


# नाबाद चार दशकांच्या शिक्षण प्रवासातील आदर्श केंद्रप्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ

हिवरापहाडी ते कोळवाडी,अवघा चार दशकांचा दीर्घ शिक्षण प्रवासातील आदर्श शिक्षक, प्राथमिक पदवीधर, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख इत्यादी शिक्षण क्षेत्रातील विशेष जबाबदारी निभाऊन श्री लक्ष्मीकांत बापूदेव अवढाळ हे नियत वयोमानानुसार निवृत्त होत असून सेवा पुर्ती सन्मान सोहळ्यासाठी अनेक गुरुजनानी त्यांच्या या कार्याला हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.०३/०७/१९६८ रोजी लक्ष्मीकांत अवढाळ सर यांचा हिवरा पहाडी,ता.केज या ठिकाणी जन्म झाला.गावात फक्त चौथी पर्यंत शिक्षणाची सोय होती.पुढील शिक्षणासाठी या डोंगराळ व दुर्गम भागातून देवळा खडकी सुमारे सहा किलोमीटर अंतरावर पायी चालत दोन नद्या





ओलांडून आपले सातवी पर्यंत चे शिक्षण पूर्ण केले.नववी दहावी शिक्षण ल.ना.होशिंग विद्यालय जामखेड येथील वस्तीगृहात राहून पुर्ण केले.भगवान विद्यालय बीड या ठिकाणी दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर बापुजी साळुंखे अध्यापक महाविद्यालयात दोन वर्षांचा डि.एड.पुर्ण केल्या नंतर १७/११/१९८६ रोजी म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षी प्रथमच नियुक्ती आपल्या जन्म गावी मिळाली.ज्या शाळेत प्रथम श्रीगणेशा गिरवीला त्याच शाळेत उत्तम विद्यार्थी घडविण्याची संधी चालून आल्यावर त्या संधीचे सोने अवढाळ सरांनी केले.एक ते चार वर्ग आणि पट संख्या ११०आणि अध्यापन करणारे मास्तर दोनच... आजच्या सारखी परिस्थिती नव्हती.मुख्य रस्त्यापासून गाव सुमारे पंधरा किलोमीटर दूर अंतरावर..पायी पायपीट करावी लागत असे... संपूर्ण गाव ऊसतोड कामगारांचे... चौथी सुटली की.. शिक्षण सुटलं म्हणून समजा...हा वनवास दूर करण्यासाठी लक्ष्मीकांत अवढाळ सरांनी सरकार दरबारी प्रयत्न करुन सातवी पर्यंत गावात प्राथमिक शिक्षण आणले.आता शाळा सातवी पर्यंत विद्यार्थी संख्या २५०अन शिक्षक मात्र दोनच... आशा बिकट परिस्थितीत मुलांना चारही बाजूंना चांगला रस्ता नव्हता.गावकर्यांचे सहकार्य मिळाले.१९९३लाशिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून बहिस्त विद्यार्थी म्हणून बी.ए.उतीर्ण..देवळा खडकी येथे प्रा.प.नियुक्ती..गावातच राहून मन लावून अभ्यास केला २०१०रोजी यशवंत मुक्त विद्यापीठ नाशिक ची बी.एड.पदवी घेऊन अनेक विद्यार्थी, नवोदय विद्यालय स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षेत जादा तासिका घेऊन विद्यार्थी घडवले पुढे पाली, नंतर पारगाव सिरस, केंद्र प्रमुख अनुभव, पुढे धोंडीपुरा केंद्रामध्ये वरवटी या ठिकाणी बदली तेथे ही केंद्र प्रमुख जबाबदारी... आपल्या शाळेतील अध्यापन कार्य सांभाळून केंद्रातील शाळेला भेटी, उत्तम शिक्षण परिषदा यशस्वी केल्या.सुमारे८२शाळा सांभाळण्याचा अनुभव... चाळीस वर्षे अध्यापनाबरोबर कार्यालयीन कामकाजाचा अनुभव....आज सेवा पुर्ती सन्मान सोहळ्यास सामोरे जात असताना अवढाळ सरांचे विद्यार्थी डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शिक्षक, पुढारी उत्तम शेतकरी आपल्या मिळवलेल्या ज्ञान शिदोरीत आवढाळ सरांप्रती कृतज्ञता व्यक्त करत आहेत.



**प्रासंगिक**
**गंगाधर सरवदे**

# राक्षसभुवनह्नबोरगाव परिसरात रात्रीच्या अंधारात अवैध वाळू उपसा सुरू?

## महसूल विभागाची डोळेझाक, पोलीस प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचा आरोप; वाहनांच्या आवाजाने ग्रामस्थांची झोप उडाली

## पोलीस अधिक्षक यांचा विश्वासपात्र चकलांब्याचे सपोनि इंगळे जाणून बुजून झोपेचे सोंग घेतोय का?

राक्षसभुवन (सरकार):गेवराई तालुक्यातील राक्षसभुवनह्नबोरगाव परिसरात गोदावरी नदीपात्रातून रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. रात्री उशिरापासून पहाटेपर्यंत सुरू असलेल्या डंपर, ट्रॅक्टर व इतर वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे परिसरातील नागरिकांना रात्रभर जागून काढावी लागत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, धोंडराई महसूल मंडळ व चकलांबा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरू असून संबंधित यंत्रणेकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महसूल विभाग डोळेझाक करत असल्याचा, तर पोलीस



प्रशासनाकडून अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

रात्रीच्या शांततेत अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने ध्वनीप्रदूषणासह अपघाताचा धोका वाढला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल होत नसल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे.

दरम्यान, अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राचे पर्यावरणीय नुकसान होण्याबरोबरच शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी तातडीने संयुक्त मोहीम राबवून अवैध




वाळू उपसा व वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### .''रात्रभर वाहनांची वर्दळ; नागरिक त्रस्त''

राक्षसभुवनह्नबोरगाव परिसरात रात्रीभर सुरू असलेल्या अवजड वाहनांच्या आवाजामुळे नागरिकांची झोप उडाली असून, अवैध वाळू उपसा थांबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

### राक्षसभुवन येथील विश्रामगृह बनले वाळूचा अड्डा?

राक्षसभुवन येथील शासकीय विश्रामगृह परिसरात रात्रीच्या वेळी वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांची वर्दळ वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. संबंधित परिसराचा अवैध वाळू व्यवहारासाठी वापर होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी व दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी,अशी मागणी होत आहे.

# अनुकंपा धारकांना नोकरी मिळण्याची प्रक्रिया गतिमान करा–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## माहिती न देणाऱ्या व अनुपस्थित कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस

बीड (सरकार): सामान्य प्रशासन विभागाच्या १५ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार गट–क पदासाठी अनुकंपा नियुक्तीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यानुसार जिल्ह्यातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून अनुकंपाधारक उमेदवारांची अद्ययावत प्रतीक्षासूची व रिक्त पदांची माहिती मागविण्यात आली होती. मात्र, अद्यापही काही कार्यालय प्रमुखांनी ही माहिती सादर केलेली नाही. अनुकंपा धारकांना रिक्त पदावर लवकरात लवकर नोकरी देण्याचा माझा मानस आहे. तरी अनुकंपा धारकांना वेळेत नोकरी मिळण्यासाठी प्रक्रिया गतिमान करा, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात अनुकंपा नियुक्ती प्राधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत प्रत्येक विभागाच्या प्रमुखांकडून रिक्त पदांची माहिती प्रत्यक्ष जाणून घेतली. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पत्राद्वारे रिक्त पदांची माहिती मागवूनही काही कार्यालय प्रमुखांनी ती अद्यापही सादर केलेली नाही. याबाबत त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत माहिती सादर न करणाऱ्या तसेच बैठकीस अनुपस्थित असणाऱ्या कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात यावी, असे आदेश दिले. तसेच ज्या कार्यालयांनी अद्याप माहिती दिलेली नाही, त्यांनी पुढील १० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अहवाल सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये ५७ उमेदवार अनुकंपाच्या प्रतीक्षा यादीत असल्याचे या आढावा बैठकीत समोर आले आहे. अनुकंपा धारकांना वेळेत नोकरी मिळणे अत्यंत गरजेचे असून, संपूर्ण प्रक्रिया कमीत कमी वेळेत आणि नियमानुसार पूर्ण व्हायला हवी, या पायाभूत मुद्द्यावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अनुकंपा नियुक्ती प्राधिकारी आढावा बैठकीत विशेष भर दिला.

## ना.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व स्नेहभोजन



परळी (सरकार) महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रम साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी आश्रम शाळा, शिवाजीनगर येथे शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व स्नेह भोजन कार्यक्रम करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष जुगलकिशोरजी लोहिया, माजी नगरसेवक माऊलीदादा आघाव, नितीन समशेट्टे, बांधकाम सभापती प्रा. पवनकुमार मुंडे, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, भाजप शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर, सरचिटणीस प्रितेश तोतला, उपाध्यक्ष प्रशांत कराड, कोषाध्यक्ष अनिश अग्रवाल, राहुल केंद्रे, केशव नागरगोजे, नगरसेवक प्रणव मराठे, युवा मोर्चा अध्यक्ष सुशील हरंगुळे, चिटणीस जितेंद्र मस्के उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजक अश्विनकुमार आघाव यांचे यावेळी आश्रम शाळेतर्फे आभार मानण्यात आले यावेळी आश्रम शाळेतील मुख्याध्यापक सर्वश्री उल्हास पवार , मोरे सर, क्षीरसागर सर, मस्कले सर, यरकलवाढ सर, गणेश होळंबे सर, डावखरे सर खंडू लांडगे यांनी कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सौ उमाताई चंद्रकांत समशेट्टे यांनी सर्व उपस्थित शिक्षकांचे व पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करून कौतुक केले.

## उपवर्गीकरणाच्या विरोधात पुकारलेल्या आंदोलनात सामील होऊन शक्ती प्रदर्शन करा: किसन तांगडे

बीड (सरकार) अनु–जातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरणाचा मुद्दा समोर ठेवून अनु–जातीमधील ५९ जातींना आरक्षणाच्या लाभापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र राज्यकर्त्यांकडून राज्यभर राबविण्यात येत आहे. आरक्षणातील उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे या मागणी करिता केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशावरून युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि. २७ जुलै २०२६ रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर सकाळी ठीक ११ वाजता तीव्र निदर्शने आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.



अनु–जातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण लागू करण्याचे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी व आरक्षणाच्या माध्यमातून ५९ जातींना मिळालेले आरक्षणातील हक्क आबाधित ठेवण्यासाठी उपवर्गीकरणाच्या विरोधात रिपाइंच्या वतीने सोमवार दि. २७ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर पुकारलेल्या तीव्र निदर्शने आंदोलनात रिपाइं पदाधिकारी, महिला पदाधिकारी, युवक कार्यकर्ते, गायरान धारक, घरकुलधारक, यांनी हजारोच्या संख्येने सामील होऊन शक्ती प्रदर्शन करावे असे आवाहन रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे, शाहू डोळस, सुभाष तांगडे, सतीश शिनगारे, भाऊसाहेब कांबळे, राजू वक्ते, राहुल कांबळे, देवानंद वाघमारे, रामेश्वर खळगे, आप्पा शेळके, भास्कर जावळे, अविनाश अवघड, बंडू ठोंबरे, विशाल इंगोले, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, भीमराव घोडेराव, विशाल गव्हाणे, मनोज ससाने, आप्पा पवार, संतोष जाधव, अजित सावंत, भैय्या वाघमारे, प्रणव पायाळ, आकाश साबळे, रवींद्र वीर, नवनाथ डोळस, समाधान गवळी, कल्याण सोनवणे, सुशील तांगडे, अमोल डावकर आदींनी केले आहे.

## थेरला जिल्हा परिषद शाळेची वर्गखोलीची भिंत मध्यरात्री कोसळली

पाटोदा (सरकार): पाटोदा तालुक्यातील तांबा राजुरी केंद्रांतर्गत थेरला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या जीर्ण झालेल्या वर्गखोलीची भिंत व छत गुरुवारी (दि. २३) मध्यरात्री कोसळल्याने मोठा अनर्थ टळला. सुदैवाने त्यावेळी शाळेला सुटी असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेमुळे जिल्हा परिषद शाळांच्या धोकादायक अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या शाळेचे तातडीने **स्ट्रक्चरल ऑडिट** करून नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) **डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे. थेरला येथील इयत्ता



दहावीपर्यंतच्या जिल्हा परिषद शाळेत सुमारे २३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन १९६५ मध्ये बांधण्यात आलेल्या शाळेतील पाच वर्गखोल्या अत्यंत जीर्ण झाल्या असून त्यांच्या दुरुस्ती अथवा नव्या बांधकामाची मागणी मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीकडून वारंवार करण्यात आली होती. मात्र प्रशासनाने या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केले. दरम्यान, पाच नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम अद्याप अपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांना मोडकळीस आलेल्या जुन्याच वर्गखोल्यांमध्ये बसविण्याची वेळ शिक्षकांवर आली होती. पावसाळ्यात धोका अधिक वाढला असतानाच गुरुवारी मध्यरात्री एका वर्गखोलीची भिंत व छत कोसळले. सुदैवाने शाळा बंद असल्याने मोठी दुर्घटना टळली. शाळेचे मुख्याध्यापक प्रताप काळे यांनी सांगितले की, शाळेच्या दुरुस्तीबाबत प्रशासनाला वेळोवेळी कळविण्यात आले होते. मात्र उन्हाळ्यात आवश्यक दुरुस्ती करण्यात आली नाही. भिंत कोसळल्यानंतर संबंधित वर्गात विद्यार्थ्यांना बसविणे शक्य नसल्याने त्यांना नवीन बांधकाम सुरू असलेल्या वर्गखोल्यांमध्ये बसविण्यात आले आहे. मात्र तेथे फळा, बसण्याची व्यवस्था व इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या असल्याने अध्यापनात अडचणी येत आहेत. याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली आहे.

## विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच महाराष्ट्राची वारकरी संस्कृती मूल्ये आणि भक्तीभावाचे संस्कार रुजावेत:डॉ.दीपाताई क्षीरसागर

बीड (सरकार): विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच महाराष्ट्राची वारकरी संस्कृती, मूल्ये आणि भक्तीभावाचे संस्कार रुजावेत या प्रमुख उद्देशाने या बालगोपालांच्या दिंडीचे आयोजन केले होते असे प्रतिपादन बालरंगभुमी परिषद शाखा बीडच्या अध्यक्ष व नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी केले.

बालरंगभूमी परिषद बीड शाखा, सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला विज्ञान व वाणिज्य् महाविद्यालय बीड तसेच नाट्यशास्त्र विभाग, संगीत विभाग आणि यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच नवगण शिक्षण संस्थेच्या संभाजी प्राथमिक विद्यालय, रामतीर्थ कुंड हायस्कूल बीड सैनिकी माध्यमिक विद्यालय, जिनीयस इंग्लीश स्कुल यांच्या सहकार्याने एका भव्य वारकरी बालगोपाळांची दिंडी आयोजन करण्यात आले होते. वारकरी संप्रदाय आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अनोखा संगम यावेळी पाहायला मिळाला. या विशेष उपक्रमात बाल



गोपाळांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत संपूर्ण परिसर भक्तिमय करून सोडला.

सकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि टाळ–मृदंगाच्या तालावर निघालेली ही दिंडी उपस्थितांचे मुख्य आकर्षण ठरली. चिमुकल्या बाल गोपाळांनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत, मस्तकी टिळा लावून आणि हातात भगव्या पताका घेत या दिंडीत सहभाग नोंदवला. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. उपस्थित बालकांच्या चेहऱ्यावरचा उत्साह आणि त्यांच्या शिस्तबद्ध सहभागाने उपस्थितांची मने जिंकली. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमास संभाजी प्राथमिक शाळा शिवाजी नगर बीड च्या मुख्याध्यापिका श्रीमती भोज , श्रीमती खरसाडे, श्री. उगले, श्री. रणखांब ,श्रीमती शिंदे,श्रीमती खडके, श्रीमती वायभट तसेच रामतिर्थ प्रा. शाळा बीड चे मुख्याध्याकपक श्री बरकसे एस. बी., शेख एल. एम. श्रीमती भुसारी, गिलचे आर. आर. , सोळुंके आर. बी., शिंदे ए. आर., लांडगे एम. आर. सैनिक विद्यालयचे श्री. मिलींद शिवणीकर, सुनिल आडागळे, सौ. के.एस.के महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य तथा नाटयशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए. एस. कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर यांच्या प्राध्यापक, बालरंगभूमी परिषदेचे अमित गाडे, बाबासाहेब कांबळे, डॉ. दुष्यंता रामटेके, प्रा. सुरेश थोरात, प्रा. प्रियंका देशमाने, प्रा. इंद्रजित भांगे, श्री. नामदेव साळुंके, श्रीमती अनुराधा चिंचोलकर तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार श्री. मिलींद शिवणीकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी सर्व बाल गोपाळांचे अभिनंदन करण्यात आले व या सांस्कृतिक उपक्रमाच्या यशस्वितेबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला.

## शिवसेना अल्पसंख्यांक माजलगाव तालुकाप्रमुखपदी मोहम्मद शेख यांची निवड



माजलगाव (सरकार): वंदनिय हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने श्रीमान धर्मवीर आंनद दिघे यांची शिकवण व पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , यांच्या मार्गदर्शनाखाली व खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने

शिवसेना अल्पसंख्यांक आघाडीच्या माजलगाव तालुकाप्रमुखपदी भाटवडगाव येथील शिवसैनिक मोहम्मद शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेतील पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य आणि सामाजिक कार्याची दखल घेत शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार सईद खान यांनी ही नियुक्ती जाहीर केली.

नुकताच शिवसेनेत प्रवेश केलेल्या मोहम्मद शेख यांनी अल्पावधीतच पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी केलेले कार्य आणि समाजातील विविध घटकांशी ठेवलेला संपर्क यामुळे त्यांच्यावर तालुका प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

नियुक्तीप्रसंगी शिवसेना माजलगाव तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले, शहरप्रमुख धनंजय (पापा) सोळंके, विधानसभा समन्वयक धोंडीराम जाधव, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, युवा सेना विधानसभा संपर्कप्रमुख प्रदीप देशमुख, उपशहरप्रमुख सुरेश नवले, रमेश साळवे, शेख अजीम, दादाराव अनभुले, अशोक अनभुले, गौतम त्रिभुवन, विक्रम वाघमारे, शेख मोसिन, अखिल शेख, पठाण सलमान, सुधाकर कुटे, इस्माईल शेख, आयुब पठाण यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहम्मद शेख यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे .

## प्रियदर्शनी प्राथमिक व राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त बाल वारकरी दिंडी संपन्न

बीड (सरकार): प्रियदर्शनी प्राथमिक व राष्ट्रीय प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक व व्यवसाय अभ्यासक्रम विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त बाल वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. बालदिंडीची सुरुवात राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री.पी.एन. पाटील यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीचे पूजन करून झाली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी,ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, संत मुक्ताबाई त्याचप्रमाणे वारकरी अशा वेगवेगळ्या वेशभूषेत व मुलींनी डोक्यावर तुळशी



वृंदावन घेऊन सहभागी झाले.टाळमृदंगाच्या आवाजाने सर्व परिसर दूमदूमून निघाला. विठ्ठलाचा जयघोष करीत पायी दिंडीत विद्यार्थी शिक्षक व पालक सहभागी झाले होते . नागरिकांनी दिंडीचे आपापल्या घरासमोर रांगोळी व औक्षण करून स्वागत केले. विद्यार्थ्यांना शिक्षण तर आवश्यक आहेच परंतु शिक्षणाबरोबर सण संस्कृती परंपराचे रक्षण करणे व महत्त्व जाणून घेणे हे देखील राष्ट्रहिताच्या दृष्टीने तितकेच महत्त्वाची ठरते. बाल वारकरी शिक्षक व सर्वांनी उत्साहात टाळ मृदुंगाच्या गजरात ताल धरला. बालकांचा व पालकांचा उत्साह खूपच जास्त होता.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)